निबंध
२८४५
REFBK-0023096
REFBK-0023096

२१५१
निबंध [समीक्षा]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
असे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा
वर्गणी भरावी लागेल.

12 JAN 1986

12 JAN 1986

( क्र. मा. प. )
५०००-४-८०

निबंध (समाज)
२८४५
२३०९६
११।२।८९
संदर्भ शाखा

ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
... शाखा (स्थळ प्रत)

विसाव्या शतकाचे

# म हा नि र्वा ण

REFBK-0023096
REFBK-0023096

कुमार केतकर

ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ

ग्रंथाली पुस्तिका : १

प्रकाशक
दिनकर गांगल
चिटणीस, ग्रंथाली
३४/९०२ नेहरूनगर,
कुर्ला, मुंबई ४०० ०२४

© ग्रंथाली

मूल्य २ रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४, टिळक रोड
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ
भविष्यातील महानिर्माणाच्या दिशेने उचललेले पाऊल. पेशावर येथील उत्खननात सापडलेल्या गौतमबुद्धाच्या प्रचंड पुतळ्याच्या पायाचे छायाचित्र.

( छाया : गाय थॉमस )

# निवेदन

आंतरराष्ट्रीय नाट्य महोत्सवामध्ये थिएटर ॲकॅडमीचा सहभाग ही महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या दृष्टीने गौरवाची बाब आहे. प. बर्लीनमधील महोत्सवात प्रयोग करण्यासाठी ॲकॅडमीच्या विजय तेंडुलकर लिखित ' घाशीराम कोतवाल ' या नाटकाची निवड झाली आहे. त्याला जोडून वेगवेगळ्या युरोपीय देशांमध्ये ॲकॅडमी या नाटकाचे बावीस प्रयोग करणार आहे. सतीश आळेकर यांच्या ' महानिर्वाण 'चा प्रयोग लंडनमध्ये व्हायचा आहे.

ग्रंथव्यवहार क्षेत्रात नव्या जाणिवांचा शोध घेऊ पाहणाऱ्या ग्रंथाली वाचक-चळवळीला, रंगमंचावरील अभिनव प्रयोग सादर करणाऱ्या थिएटर ॲकॅडमीच्या कर्तृत्वाबद्दल रास्त अभिमान वाटतो. तो व्यक्त करावा आणि ॲकॅडमी कलावंतांच्या परदेश-प्रवासास शुभेच्छा द्याव्या या हेतूने ही पुस्तिका प्रसिद्ध केली आहे.

' रंगायन 'ने तेंडुलकरांची त्यावेळी नवी वाटलेली नाटके रंगभूमीवर आणली. नाट्येतिहासाच्या दृष्टीने तो एक मोठा व महत्त्वाचा टप्पा ठरला. लेखनाबाबतीत थिएटर ॲकॅडमीची नवी प्रेरणा आहे ती सतीश आळेकर यांची. लेखन आणि नाट्याविष्कार या दोन्हीबद्दलची आळेकर यांची जाणीव आणि प्रगल्भता नुसत्या काळाच्या दृष्टीने तेंडुलकरी टप्प्याच्या बरीच पुढची असणार हे उघड आहे. पण आळेकर केवळ काळाबरोबरच नाही तर अनेक वेळा काळाच्याही पुढे गेलेले दिसतात. त्यांच्या लेखनातील अशा जागा ' महानिर्वाण ' या नाटकामध्ये ठायी ठायी आढळतात. मानवी जीवन आणि परस्परसंबंध या संदर्भातल्या आळेकर यांच्या भूमिकेच शोध श्री. कुमार केतकर यांनी या पुस्तिकेमध्ये घेतला आहे. त्यांची ही मुख्यत: वैचारिक प्रतिक्रिया ॲकॅडमीची मंडळी परदेश-प्रवासास निघण्यापूर्वी नोंदली जावी म्हणून ही पुस्तिका प्रसिद्ध करीत आहोत. सांस्कृतिक क्षेत्रातील चळवळीबद्दल ग्रंथालीला स्वाभाविकपणेच वाटणाऱ्या आत्मीयतेचे सहज झालेले हे प्रकटन आहे. त्याच भावनेने रसिकांनी या पुस्तिकेचा स्वीकार करावा. यातील प्रतिपादनाबाबतचा अभिप्राय जाणून घेण्याची उत्सुकता आहे.

पुन्हा एकदा ॲकॅडमीच्या पुढील वाटचालीस ग्रंथालीच्या शुभेच्छा व्यक्त करतो.

**दिनकर गांगल**
चिटणीस, ग्रंथाली

“ धैर्य दे अन् नम्रता दे
        पाहण्या जें जें पहाणें,
वाकुं दे बुद्धीस माझ्या
        तप्त पोलादाप्रमाणें;

घेऊं दे आघात तीतें
इंद्रिय-द्वारां जगाचे;
पोळूं दे आंतून तीतें
गा अतींद्रियार्थ आंचे. ”

— बा. सी. मर्ढेकर

‘ महानिर्वाण ’विषयी लिहायला खरे म्हणजे आज मर्ढेकर हवे होते. आपल्या मूल्यव्यवस्थेवर चौफेर तलवार चालवणाऱ्या सतीश आळेकरांच्या धारदार शैलीचे त्यांनीच योग्य कौतुक केले असते. काळीज कापत जाणाऱ्या विनोदाचे योग्य मूल्यमापन त्यांनीच केले असते. तप्त पोलादी कांबीसारख्या मनसोक्त वाकणाऱ्या आळेकरांच्या भाषेचे रहस्य त्यांनी उलगडून सांगितले असते. मराठी साहित्यात व विशेषत: नाट्यकलाकृतीत ‘ महानिर्वाण ’ने जे उत्तुंग शिखर गाठले आहे, त्या शिखरावर आपली नजर खिळवून टाकण्यासाठी मर्ढेकरांची आपल्याला मदत झाली असती. आकृतिबंधांचे सर्व बांध फोडून नवीन शतकात झेपावू पाहणाऱ्या या नाटकाला आंतरराष्ट्रीय कीर्ती प्राप्त करून देण्यासाठी मर्ढेकरांनी निश्चितच प्रयास घेतले असते.

तसे पाहिले तर महानिर्वाण हे नाटक नाही. गिरीश कर्नाड यांनी म्हटल्या-

प्रमाणे ' अस्तंगत होणाऱ्या मूल्यव्यवस्थेवर चढवलेला तो गनिमी हल्ला ' आहे. हा हल्ला इतक्या चपळाईने, चातुर्याने आणि सहजतेने चढवला आहे की प्रेक्षक जेव्हा नाट्यगृहातून बाहेर येतो तेव्हा कुठे त्याच्या लक्षात येते की त्याने स्वतः-भोवती उभारलेले संरक्षक कोट कोसळून पडले आहेत. आपल्या जीवनाकडे, मानवी परस्परसंबंधांकडे, कौटुंबिक जीवनाकडे, मृत्यूच्या गूढाकडे आणि भाषेच्या आविष्काराकडेही आपण अधिक मुक्त नजरेने पाहू लागलो आहोत याची जाणीव प्रेक्षकाला होते. ओघात सहज आठवली म्हणून सांगतो. एक तिबेटी कथा आहे—

विजनवासात राहणाऱ्या आणि चिंतन करणाऱ्या एका तिबेटी संन्याशाला नेहमी एक कोळी दिसायचा. दिसामाजी तो कोळी मोठा–मोठा होत असल्याचे त्याला भासत असे. सरतेशेवटी तो कोळी माणसाएवढा मोठा होऊन आपल्याला धमकावतो आहे असे त्या संन्याशाला वाटू लागले. संन्याशी गुरूकडे गेला आणि त्याने त्याला विचारले, ' मी काय करू ? मला त्या कोळ्याचे विलक्षण भय वाटते आहे. '

गुरूने सल्ला दिला, ' पुन्हा असा कोळी दिसला की प्रथम त्याच्या पोटावर फुली मार. नंतर थोडा विचार करून त्या कोळ्याच्या पोटात खंजीर खुपस. '

दुसऱ्या दिवशी संन्याशाला पुन्हा तो माणसाएवढा प्रचंड कोळी दिसला. संन्याशाने त्याच्या पोटावर एक फुली मारली. आता थोडासा विचार करून तो त्या कोळ्याच्या पोटात खंजीर खुपसणार तोच त्याच्या ध्यानात आले की आपण फुली आपल्याच बेंबीवर मारली आहे. संन्यासी घाबरला आणि पळत परत गुरूकडे गेला. गुरूने मंद स्मित केले. तो संन्याशाला म्हणाला, ' आपले अंतर्गत शत्रू कोण आणि बाहेरचे शत्रू कोण हे ओळखणे हा खरोखरीच जीवनमरणाचा प्रश्न आहे. कोळ्याचे स्वरूप धारण करणारी ती एक जुलमी मूल्यव्यवस्था होती जिचा पगडा अजून तुझ्या मनावर आहे आणि म्हणून खंजीर मारायचा झाला तर त्या मूल्यव्यवस्थेच्याच पोटावर मार. '

नाटकाचा पडदा वर जातो तेव्हा रंगमंचावर मध्यभागी चटई अंथरलेली दिसते. तीवर एकजण डोक्यापासून चादर घेऊन झोपलेला आहे. वय ४५ च्या आस-

पासची एक देखणी स्त्री घर आवरत असल्याचा आविर्भाव करते आहे. जो माणूस झोपलेला आहे, तो तिचा नवरा—भाऊराव. उन्हे डोक्यावर आली तरी तो उठलेला नाही म्हणून ती—रमा—चिडलेली आहे. नाटक सुरू झाल्यानंतर लगेच स्पष्ट होते की भाऊरावांचा झोपेतच रक्तदाबाने अंत झाला आहे आणि प्रत्यक्ष भाऊराव जरी बोलत असले तरी तो आहे केवळ त्यांचा चराचरातून उमटणारा आवाज.

"प्रिये, तुला निदान माझा आवाज तरी ऐकू येतोय. इतरेजनाला तोही ऐकू येणार नाही, दिसणार तो फक्त माझा मृत देह. म्हणून सांगतो प्रिये, तुझा माझा प्रवास आता वेगवेगळा. येथवर चालत आणलेल्या संसाररथाचे एक चक्र आज कालगतीत सामावून जात आहे. आता तुलाच कर्ण बनून दुसरे चाक व्हावे लागेल. मला कल्पना आहे त्रासाची. एखादा अर्जुन भेटेल तेव्हाच सुटशील. पण हा यमरूपी अर्जुन भेटेपर्यंत कदाचित पार म्हातारी झाली असशील. आणि सरतेशेवटी तू हा मोडका रथ आपल्या, एकुलत्या एक चिरंजीवांच्या, नानाच्या स्वाधीन करून माझीच वाट चोखाळणार."

भाऊराव प्रत्यक्षात मेलेले असले तरी नाटकाच्या आकृतिबंधात परिणामकारक-रीत्या त्यांचे जीवन, तत्त्वज्ञान, आकांक्षा, जीवनाबद्दलची तृष्णा मांडण्यासाठी भाऊराव प्रेक्षकांशी बोलतात. चटईवर प्रथम फक्त शाल, नंतर त्या जागी फक्त ताटी असे दाखवून त्यांच्या मृत्यूचा परिणाम साधण्यात येतो. भाऊरावांचा आपल्या बरोबरचा संवाद कीर्तनातून होत राहतो. मधूनमधून तेच नाटकाचे सूत्रधार बनतात.

"मोठा गंभीर प्रसंग उभा राहिला आहे. चाळकऱ्यांना तर पर्वणीच आहे. माझा देहान्त झालेला. दारी रमा एकटी नी नाना परगावी अशी योजना झालेली. माझ्यावरचे अंत्यसंस्कार नानाच्या आगमनावर अवलंबून. पण ह्या चाळकऱ्यांनी माझा प्रवास कसा घडवून आणला? वाटेत काय झाले? अडचणी आल्या किंवा काय? कुणास आनंद, कुणास दु:ख, कुणास भय तर कुणी चिंताग्रस्त पण अंतर्यामी सगळेच तटस्थ. हे सगळे सांगण्यासाठी केला असे हा कीर्तनाचा प्रपंच. ह्या सर्व मंडळींनी माझ्या मृत्यूचे केले महानिर्वाण, त्याला मी तरी काय करणार? म्हणून लावावे लागते आहे (कीर्तनाच्या सुरात) "आख्यान महानिर्वाण."

• •

नाना हा भाऊराव आणि रमा यांचा एकुलता एक मुलगा—विशीतला. भाऊरावांच्या अंत्यसमयी तो जवळ नाही. बाहेरगावी आट्यापाट्यांचे सामने भरले आहेत, त्यात भाग घेण्यासाठी तो गेला आहे. रमा विधवा झाली आहे. चाळीत गेल्या कित्येक दिवसांत कोणाचा मृत्यू न झाल्याने भाऊरावांच्या निधनाला उत्सवाचेच स्वरूप आले आहे, भाऊरावांचा आवाज रमेला इशारा देत आहे, "चाळकरी चाल्रून येत आहेत...रमे, माझ्या प्रिये, सावर स्वतःला. सावधान"

एव्हाना चाळकरी चारही बाजूनी जमा झाले आहेत. मध्यभागी रमा पांढरे नऊवारी लुगडे नेसून बसली आहे. केस मोकळे सोडले आहेत. मळवट भरला आहे आणि ती सफरचंद खात आहे. चाळकऱ्यांनी चारी बाजूंनी उद्घोष चालवला आहे,

"उदे ग रमे उदे । उदे ग रमे उदे ॥
आम्ही सज्जन चाळकरी । आम्ही तुपाशी खाणार पोळी ॥
उदे ग रमे उदे । उदे ग रमे उदे ॥
अवचित अघटित घडले नी भाळ पांढरे झाले ।
भाळ पांढरे झाले नी विधवा म्हणती सारे ॥

नाटकातील हा प्रसंग पाहताना मला आठवण झाली ती ना. वि. जोशी यांनी लिहिलेल्या 'पुणे शहराचे वर्णन' या जुन्या पुस्तकातील एका प्रसंगाची. प्रसंग असा : एक स्त्री सती जात असताना तिचे अंग पोळून ती बाहेर निघाली. ....सर्व अंगाची आग आग झाली होती...स्मशानाजवळील नदीत उडी टाकण्यासाठी ती नदीच्या दिशेने पळू लागली. पण जमलेल्या आप्तेष्ट-नातेवाईकांनी तिला पकडून जुलमाने सरणावर फेकली आणि वर मोठमोठाले ओंडके टाकून तिचा प्राण घेतला.

या नाटकातील विधवा रमा ही काही सती जात नसते. पण तरीही मला वाटत राहिले की ज्या आप्तेष्ट-नातेवाईकांनी चितेवरून पळून जाणाऱ्या तरुणीला परत सरणावर फेकून तिचा प्राण घेतला होता ते आप्तेष्टच जणू येथे 'उदे ग रमे उदे' म्हणत फेर धरून नाचत आहेत. खरे म्हणजे, 'महानिर्वाण'मधील चाळकरी ही माणसे नाहीत तर परंपरांच्या ओझ्याखाली वाकलेल्या त्या वृत्तीच आहेत.

महाराष्ट्रात यादव कालापासून इंग्रजांची अबाधित सत्ता प्रस्थापित होईपर्यंत सर्व जाती–जमातींत सती जाण्याची प्रथा होती. राजपुताना आणि बंगाल या प्रदेशांत सतीची पद्धत अधिक व्यापक प्रमाणात प्रचलित होती. लोकहितवादींच्या म्हणण्यानुसार पेशवाईच्या काळात महाराष्ट्रात सतीची चाल विशेष रूढ होती.

" शूद्र स्त्रियांची सती जाण्याची पद्धत वेगळी होती. साधारण वाळूच्या जागेत काही फूट खोलीचा खड्डा जमिनीत खणला जाई. त्यात मेलेल्या पुरुषाचे प्रेत व त्याच्या शेजारी सती जाणारी स्त्री असे दोघांना झोपवीत. सतीचे दिव्य पाहायला आलेली नातेवाईक व आप्तेष्ट मंडळी वाळूची घमेली भरून घेऊन उभीच असत. वाळू भराभर ओतून ती सर्वजण मिळून शक्यतो लवकर खड्डा भरीत. किंबहुना जमिनीपासून फूटभर उंच असा ढिगारा रचीत. नंतर त्या ढिगाऱ्यावर सर्वजण नाचत, कुदत. आतली स्त्री मेली अशी खात्री झाली की निघून जात. "
( श्रीमती शारदा देशमुख यांच्या संशोधन प्रबंधातून )

आज जग एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर आले असताना देखील या धर्मपरंपरांचे ओझे आपल्या समाजाने पूर्णपणे फेकलेले नाही. काही वर्षांपूर्वी जाहीररीत्या सतीच्या चालीचा पुरस्कार कै. पु. भा. भावे यांनी केला होता. अजूनही रणजित देसाईंची 'स्वामी' कादंबरी वाचताना वा ' रमा–माधव ' नाटक पाहताना ' सती 'च्या उदात्तीकरणाने मोहरून गेलेले वाचक–प्रेक्षक दिसतात. त्यांच्या मनात खोलवर कुठेतरी " खरंच, आपण मेल्यावर आपली पत्नीही... " असे काही उमलू लागलेलेही जाणवते. आजचा सामाजिक परिसर मात्र पूर्णपणे बदललेला आहे. थेऊरला जाऊन सतीच्या वृन्दावनापुढे नतमस्तक होणारे हे लोक त्या निर्घृण परंपरेपुढेच लीन होत असतात आणि आपले क्रौर्यही आजच्या समाजपरिस्थितीनुरूप बदलत्या स्वरूपात व्यक्त करत असतात. आज ते म्हणतात,

" सावर गे माये, घराचे कवाड लोटून घेणे ।
कवाड लोटून घेणे, परस्था प्रवेशू न देणे ।।
उदे ग रमे उदे । उदे ग रमे उदे ।।
येऊ नाही देणे, सदा अंधारातच राहाणे ।
अंधारी रहाणे सदा विधवा म्हणुनी घेणे ।।
उदे ग रमे उदे । उदे ग रमे उदे ।।
विधवा म्हणुनी घेणे, आमची सोय जरा पाहाणे ।

आम्ही सज्जन चाळकरी । आम्ही तुपाशी खाणार पोळी ।
उदे ग रमे उदे । उदे ग रमे उदे ॥ ''

मध्ययुगीन युरोपमध्ये युद्धावर जाणारे पुरुष सरदार आपल्या बायकांच्या कमरेभोवती Chastity Belt ( शीलसंरक्षक पट्टा ) बांधत असत. या पट्ट्याला कुलुपाची सोय होती. आपल्या अनुपस्थितीत आपली स्त्री दुसऱ्या कोणाशी संग करील या भीतीने नवरा तिच्या कमरेला हा पट्टा बांधून कूलुप लावत असे व आपल्याबरोबर किल्ली घेऊन जात असे. अनेकदा तो मोहिमेवर मृत्युमुखी पडे. आपल्या इंद्रियांना करकचून आवळणारा तो पट्टा त्या स्त्रियांना जाचत असे. नैसर्गिक विधी करणेही त्याना कित्येकदा अशक्य होई. या जाचाला कंटाळून कितीतरी स्त्रियांनी आत्महत्या केल्याचे दाखले युरोपीय इतिहासात आहेत. आज युरोप–अमेरिकेत Marital Relations Detective Services ( विवाह संबंधांबाबत हेरगिरी करणाऱ्या संस्था ) आहेत—काही ठराविक ' फी 'च्या बदल्यात पुरुषांच्या वतीने बायकांवर, बहिणींवर पाळत ठेवण्यासाठी.

कधी कधी वाटते की आजही आपल्या समाजरचनेमध्येच विविध विधींनी गुंफलेल्या विणीतच फॅसिझमचे ' टू–बाय–टू 'चे धागे आहेत. त्याच समाजरचनेत या धाग्यांना छेदून जाणारे धागे आहेत हेही खरेच. ' महानिर्वाण ' नाटकात अंत्ययात्रेची तयारी करण्याच्या निमित्ताने ' चाळून ' येणारे चाळकरी विंगेत परत जाताना एक कतार उभे राहतात; त्यात एक-दोघे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा गणवेश घालून. एका कोपऱ्यात विधवा झालेली रमा उभी आहे आणि ' एक कतार ' चाळकरी तिचे कुंकू पुसत, मंगळसूत्र तोडत, तिला बांगड्या फोडायला भाग पाडत लष्करी चालीवर आत जातात. विधवेला कुरूप करण्याची, अपमानास्पद जीवन जगायला लावण्याची आपली हिडीस परंपरा अजून आपल्या मानसिकतेमधून पूर्णत: गेलेली नाही. केशवपनाच्या भीषण परंपरेनंतर नवीन आकार घेत ती वृत्ती टिकून राहिलेली आहे.

मला तरी ' महानिर्वाण 'मधील एक कतार चालणारे आणि ' चाळून ' येणारे चाळकरी हिटलरच्या फॅसिस्ट लष्करासारखे वाटले. हिटलर जणू व्यक्तीश: क्रूर विवश होऊन त्याचे स्तोम माजवीत नाहीत, आणि समाजजीवनात घुसलेल्या

होता, वेडा होता. अशा प्रकारचे समज तथाकथित मानसशास्त्रज्ञांनी पसरवण्याचा प्रयत्न गेली पस्तीस वर्षे चालवला आहे. हिटलर एका समाजव्यवस्थेतून, साम्राज्यशाही सत्तांच्या संघर्षातून जन्माला आला होता हे सांगितले जात नाही.

सती जाण्यासाठी जुल्म-जबरदस्ती करणारे आप्तेष्टही व्यक्तिश: वाईट नव्हते. परंतु एका समाजरचनेत विशिष्ट धाग्यांनी विणीत बसवलेले ते आप्तेष्ट सामुदायिकरीत्या अतिशय निर्घृण वर्तन करीत होते.

अलीकडे अजून एक समज काही विचारवंतांकडून मुरवण्याचा प्रयत्न होताना दिसतो. तो असा : व्यक्ती चांगली असते, पण सामुदायिकतेत क्रौर्य असते. Mobocracy म्हणून सामुदायिकतेची टिंगल-टवाळी-टीका करण्यात येते. आपण एक लक्षात ठेवायला हवे : दोष सामुदायिकतेत, सामाजिक जीवनात नाही तर समाजातील मूल्यव्यवस्थेत आहे. आणि प्रचलित मूल्यव्यवस्था बदलल्याखेरीज सुदृढ सामाजिक जीवन निर्माण करता येणार नाही. ही मूल्यव्यवस्था उत्पादन प्रक्रियेत व उत्पादनसंबंधात घडणाऱ्या बदलांबरोबर विकसित होत असते, पुन्हा अडखळत असते आणि पुन्हा बदलते.

गेल्या शंभर वर्षांत समाज खूपच पुढे गेला आहे. ज्या पद्धतीने स्त्रियांची विटंबना सरंजामशाहीच्या काळात होत असे तशी भांडवलशाहीत होत नाही. परंतु मरणासन्न असलेली ही भांडवली व्यवस्था नवीन पद्धतीच्या जाचालाही जन्म देताना आढळते.

एका अर्थाने भांडवली औद्योगिक क्रांतीने माणसाला खूपच मुक्त केले आहे. स्त्रिया जेव्हा नोकऱ्या करू लागल्या, पुरुषांच्या बरोबरीने कारखाने-कचेऱ्यांत उत्पादन-प्रक्रियेत भाग घेऊ लागल्या, घराबाहेर पडण्याने त्यांचे क्षितिज जेव्हा रुंदावू लागले तेव्हा मात्र भांडवलशाहीचे धाबे दणाणले. ज्या प्रागतिक विचारांचा पुरस्कार करीत भांडवलशाहीने सरंजामी मूल्यव्यवस्थेवर हल्ला चढवला होता त्याहून अधिक प्रगत विचारांच्या आधारे ही व्यवस्थाही गाडली जाऊ शकते हे त्यांना स्पष्ट दिसू लागले.

एकत्र कुटुंबव्यवस्थेच्या कोसळणाऱ्या हवेल्यांना नैतिकतेचे सिमेंट मारून बाळ कोल्हटकरांनी ‘वेगळं व्हायचंय मला’ नाटक लिहिले. विभक्त कुटुंबपद्धती—

जी मर्यादित अर्थाने कुटुंबातील सर्वांनाच अधिक मुक्त करणारी होती— तिच्यावरही भांडवली औद्योगिक क्रांतीच्या झंझावाताचा प्रभाव पुढे पडू लागला. आता विभक्त कुटुंबपद्धतीच्या मर्यादाही स्पष्ट होऊ लागल्या आहेत. भाऊरावांच्या निधनाद्वारे, या मर्यादा मांडण्याचा प्रयत्न आळेकरांनी ‘ महानिर्वाण ’ नाटकात केला आहे. काही वर्षांनी या एकूण कुटुंब-व्यवस्थेचेच ‘ महानिर्वाण ’ होण्याची शक्यता या नाटकात प्रगट होताना आढळते.

अशा संक्रमणाच्या पंखावर वास्तव्य करणाऱ्या एका कुटुंबातील कुटुंब-प्रमुखाचा, भाऊरावांचा देहान्त झालेला आहे.

आणि भाऊरावांची ताटी बांधण्याच्या कार्यक्रमाला आता उत्सवी रूप आले आहे. ते सामुदायिक रीत्या म्हणत आहेत,

“ बांधा रे बांधा ताटी बांधा
ताणून बांधा रे येईल वांधा
बांधा रे बांधा ताटी बांधा
घट्ट बांधा रे येईल वांधा. ”

चाळीतील अनुभवी मंडळींच्या हातास ताट्या बांधून घट्टे पडले आहेत. देह जाळण्यात प्रवीण झालेली ही मंडळी चाळीतील तरुण पोरांना आदेश सोडत आहेत.

“ सामान नीट बघून आण. त्यात सुद्धा फसवतात हल्ली. सामान टांग्यातून आणायचं, रिक्षातून नाही...रिक्षात बांबू नीट बसत नाहीत. हातात धरतासुद्धा येत नाहीत...माठ विकत घेताना बघून घे. कच्चा भाजलेला किंवा बारीक भोक असलेला चालेल. कारण लवकर फुटतो...घासलेटात मापे मारू नका म्हणावे. किमान बियरच्या सहा बाटल्या भरून तरी हवे घासलेट. त्यास म्हणावे स्वतःचा बाप मेला असे समजून देशील तसे सामान निवडून दे....आणि गवऱ्या फार होतात म्हणून कमी केल्यास तर बघ. धग कमी होता कामा नये. आपण लवकर मोकळे झाले पाहिजे. नळ जाण्याच्या आत आंघोळी व्हायला हव्यात आपल्या. काय ? ”

एका बाजूला ही कोरडी ताटी-तंत्र-तज्ज्ञता आणि दुसऱ्या बाजूला न जाणव-

लेल्या शोकाचे अवडंबर. आळेकर विडंबन करत आहेत ते त्या मृतदेहाचे नव्हे, अंत:करणापासून झालेल्या शोकाचेही नव्हे. त्यांना जीवनाबद्दल आस्था आहे आणि मृत्यूबद्दल आत्मीयता. आळेकर हा जीवनाची भकास रूपे रंगवणारा कवी नाही. आधुनिकतेच्या नावाखाली अमूर्ततेच्या फॅशनच्या आहारी जाऊन जीवन-मृत्यू बाबत अराजकी तत्त्वज्ञान आळेकर मांडत नाहीत. देहान्त झालेले भाऊराव प्रेक्षकांना उद्देशून म्हणतात,

"मेलेला देह म्हणजे झोपलेले मूल. थेंबाथेंबाने गंगोदक सोडायचे. पण कोण सांगणार? देहान्त झाला म्हणून ठसका लागत नाही असे थोडेच आहे? ....ताटी बांधलेली आहे, नव्हे नव्हे, करकचून आवळलेली आहे. एक वेढा जबड्यातून गेल्यामुळे माझी जीभही कापली गेली आहे."

मृत देहाची विटंबना करू नका, अरे, परवापरवापर्यंत पंचप्राण देही असलेला हा माणूस तुमच्या दु:ख-आनंदात सहभागी होता, त्या तुमच्या सहवासाची तरी कृतज्ञता बाळगा आणि त्या मृतदेहाला आदर द्या, असे जणू कळवळून आळेकर आपल्याला सांगत आहेत. दररोज गाडीखाली, बसखाली, अपघातात, आजारपणाने, वृद्धापकाळाने, यातना-वेदनांनी माणसे मरत आहेत. इतकी की, जणू संवेदनाच नष्ट व्हावी. परंतु आपले समाजजीवन संवेदनाहीन झालेले नाही. संवेदनाहीन समाज जगूच शकत नाही. तसे ते व्हावे असा एखाद्या विचार-सरणीचा, शोषक वर्गाच्या विचारसरणीचा प्रयत्न आहे हे खरे आहे. हे नाटक त्या विचारसरणीच्या भोवऱ्यात सापडत तर नाहीच, पण आपल्यालाही त्यात सापडू देत नाही. आळेकरांनी तर या नाटकाद्वारे आपल्या संवेदना जागृत ठेवण्याचा एक जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. भाऊराव कळवळून आपल्याला सांगतात,

"जाळा, जाळा, लवकर न्या हो. सरणावरती चढवा....मी खराब होईन हो. माशा घोंघावू लागल्या आहेत...इतका वेळ कुणाचेच लक्ष नाही. नाना आलाय, आता तरी मला न्या. त्या ताटीचा मान राखा. अंग सगळं आंबून गेलंय, कधी राख होईल असं झालंय मला....का असा माझा दुसरा अंत बघताय?"

आळेकरांना मानव्याचा, जीवनाबद्दलचा आदर आहे पण म्हणून ते भावना-

ढोंगावर कठोर प्रहार करताना मागेपुढे पाहत नाहीत. नावीन्याच्या नावाखाली आज अनेक अराजकी कलाकृती निर्माण होत असताना ( उदा० गिधाडे ) आळेकर त्या आकर्षक वैचारिक पिंजऱ्यात अडकत नाहीत. जीवनाच्या अर्थशून्यतेचा ढोल बडवणाऱ्या फॅशनेबल तत्त्वज्ञानापासून ( चल रे भोपळ्या टुणूक टूणूक, खोटे नाटक इ० ) ते दूर राहतात. भ्रामक आशावाद दाखवणाऱ्या ढोंगी आदर्शवादी तत्त्वज्ञानाला ते भुलत नाहीत. जीवनाची स्वाभाविक गती ते सरळपणे मांडतात आणि आपल्या मूल्यव्यवस्थांनी निर्माण केलेले अंतर्विरोध जाणवतात तसे सादर करतात भाऊरावांनी आपल्या पूर्वरंगात म्हटले आहे :

“ आधी प्रपंच करावां नेटका ।
प्रसंगी घालावा कुडता फाटका ।।
होई तो जरी तोटका ।
थंडी वाजे ।।

अशी थंडीच काय पण हिवताप झाला तरी
प्रपंच नीट केला पाहिजे. ”

भौतिक सुखाबद्दल हे नाटक घृणा उत्पन्न करत नाही. संवेदनाशून्य रीतीने भौतिक जीवन जगायला विरोध करते.

( भाऊरावांना ज्या स्मशानात जाळायचे ते स्मशान नगरपालिकेने बंद केलेले असते. नवीन स्मशान शहरापासून खूपच दूर असते. केरोसीन, चांगली लाकडे ही पण काळ्या बाजारातच विकत घ्यावी लागलेली असतात. शेवटी तर. भाऊरावांच्या स्मशानातच जळण्याच्या हट्टापायी ( मी नव्या स्मशानात जळणार नाही. जळीन जुन्या तर येथेच जळीन...माझे मन इथेच गुंतले आहे ) स्मशानाच्या रखवालदारालाही दोन हजार रुपयांची लाच नानाला द्यावी लागते. जीवनाच्या आणि मृत्यूच्याही अशा बीभत्स व्यापारीकरणाचे कठोर विडंबन या नाटकात आहे. )

भौतिक सुख म्हणजे जणू काही पाप आहे असा एक सूर अलिकडे बड्या बड्या लेखकांनी घेतला होता. ‘ एक शून्य मी ’ या पु. ल. देशपांड्यांच्या लेखातही तो मंदपणे उमटला आहे. तर दुसऱ्या बाजूला भौतिक सुख म्हणजे

सर्व काही, मग ते प्राप्त करताना इतरांची क्षितीच नाही असाही एक प्रवाह होता. ही भौतिक सुखे प्राप्त करूनही मानसिक जीवन किती विदीर्ण आणि भकास करणारी गोष्ट आहे असाही एक विचार मराठी साहित्यात 'सत्यकथा'ने प्रचलित केला होता. सगळयात अलीकडची फॅशन आहे alienation (तुटलेपण).

आळेकर या सर्व प्रवाहांशी सफाईने आट्यापाट्या खेळतात आणि त्या प्रवाहांना चकवतात. कुटुंबव्यवस्थेतील जाचक परंपरांवर विनोदाच्या वज्राने आघात करताना संसाराची गोडीच नष्ट करून टाकण्याच्या पद्धतीने आळेकर आपली मांडणी करीत नाहीत. भाऊराव आपल्या 'आख्यानात' म्हणतात,

"गुदगुल्या? रमा मला गुदगुल्या करणार तू इतक्या सकाळीच. हवा तर अशी मस्त पडलीय की वाटतं तू खरोखरच गुदगुल्या कराव्यास. आणि एकदा का तू गुदगुल्या केल्यास की पुढचं सगळं मी रीतीप्रमाणे करेन. अगदी यत्किंचितही कसूर करणार नाही. पण रमा, दैवगतीपुढे काय इलाज. माझ्या देहातून तर प्राण गेलेले. तू गुदगुल्या केल्यास तरी मला गुदगुल्या होणारच, पण मला त्या शब्दात सांगण्याव्यतिरिक्त काहीही करता येणार नाही. गुदगुल्या करतानासुद्धा माझा स्पर्श निर्जीव आणि गार लागणार हे नाकारता येणार नाही, कारण ही वस्तुस्थिती आहे."

भाऊरावांना संसारात मनस्वी गोडी आहे. ते फाजील अर्थाने त्या गोडीची चेष्टाही करीत नाहीत. ती गोडी ज्या स्वरूपात आहे त्या स्वरूपात ते मांडतात.

"आमच्या घरात राजाराणीचा सुखाचा संसार चाललेला. हल्लीच्या दिवसात संसारी कमाई म्हणजे फक्त आमच्या एकुलत्या एका पुत्राची. आमच्या नानाची. आमचा नाना म्हणजे कसा...

पुत्र व्हावा ऐसा गुंडा।
त्याचा तिन्ही लोकी झेंडा॥

पण आज मोठा कठीण प्रसंग आलेला आहे. संसारचक्र अर्ध्यावर सोडून दिले गेल्यामुळे आमच्या संसाराचा झेंडा अर्ध्यावर उतरलेला आहे....आमच्या मंडळींनी मला गुदगुल्या केल्या, अंगी काटा आणला. पण काटा आणून काय उपयोग? मी तर असा मेलेला. जिवंतपणी इतका त्रास तर मेल्यावर किती? तर तात्पर्य म्हणजे–.

असू आम्ही गृहस्थाश्रमी।
स्वप्न असे अंतर्यामी॥
यत्न चालू असे जंगी।
नानास भावंड व्हावे॥"

भाऊरावांना मरायचे नाही. त्यांचे मन या संसारात अजून अडकलेले आहे. आपला नाना बाहेरगावी आट्यापाट्या खेळायला गेला याचेही त्यांना कौतुक आहे. या भौतिक जगावर त्यांचे अध्यात्मिक प्रेम आहे.

"आम्ही यमराजाला परतून लावण्याचा प्रयत्न केला, प्रसंगी त्यास गुद-गुल्याही केल्या, पण यम हसेना, परतेना, फक्त रेडा हंबरला, तत्क्षणी हृदयात चर्र झाले."

भाऊराव गेले आणि त्यांचा तरुण मुलगा नाना कुटुंबव्यवस्थेतील जुलमी मूल्यांच्या पिंजऱ्यात अडकला. स्वतःच्या इच्छेविरुद्ध अडकला.

इतिहासाच्या क्रमात जेव्हा कुटुंबव्यवस्था जन्माला आली तेव्हा तिने समाजाला पुढे नेण्याचे प्रागतिक कार्य बजावले होते. परंतु जसजसे जीवन अधिक प्रगत होऊ लागले, औद्योगिक क्रांतीमुळे वेगाने पुढे झेपावू लागले तसतशी या कुटुंबव्यवस्थेचीही प्रगतीला काही प्रमाणात अडचण होऊ लागली. या कुटुंबव्यवस्थेने, दिलेली सर्वच मूल्ये टाकाऊ नव्हती आणि नाहीत. परंतु काही परंपरा, विधी मात्र जुलमी निश्चितच आहेत. त्यांचीच तरुण नानाला भीती वाटते आहे. तो म्हणतो,

"भाऊंचा मी घेतला वसा।
जैसा हाती पकडला ससा। भीती वाटे॥

भाऊंचा वसा शिशासारखा पायात बसलाय...भाऊंचा हा वसा मला अंडर-पँटीसारखा फिट्ट बसला. तरी बारीक भीती वाटते आहे."

नानाला वाटणारी भीती 'को अहम्?' किंवा Who Am I? या प्रश्नातून निर्माण झालेली नसून Whose Am I? 'मी कोणाचा आहे?' या प्रश्नातून उभी राहिली आहे. त्याला आपल्या आईशी असलेल्या नात्यात स्पष्टता वाटत

नाही. वडिलांशी असलेले नाते त्याला विसंगत वाटते. त्याला भाऊ किंवा बहीण नाहीत. नात्यातलेही कुणी नाही. ( रमा एके ठिकाणी म्हणते, " आपल्याला नात्यातलं कुणी असतं तर त्यांनीच सगळं केलं असतं " आणि त्यावर नानाची प्रतिक्रिया असते, " हो म्हणजे आपण बिनधास्त दु:ख करायला मोकळे. " )

किंबहुना आपल्या इच्छेविरुद्ध आपल्यावर लादल्या गेलेल्या तथाकथित रक्ताच्या नात्यांचे भेदक विडंबन या नाटकात आहे. नवीन नाती तर निर्माण होत नाहीत आणि जुनी मात्र कोसळताहेत अशा बेचकीत नाना सापडलेला आहे.

डॉ. डेव्हिड कूपर हा जगप्रसिद्ध विचारवंत यासंबंधात लिहिताना म्हणतो,

" Blood is thicker than water only in the sense of being the vitalising stream of certain social stupidity. The family, for want of a capacity for producing holy Idiots, becomes moronic, ".

' मी कोण आहे ? ' यापेक्षा ' मी कोणाचा आहे ? ' – का कोणाचाच नाही ? या भीतीने नानाच्या वागण्यात तुटकपणा आला आहे, परकेपणा आला आहे. आट्यापाट्यांचे सामने संपवून नाना घरी येतो तेव्हा चाळकरी त्याला वेढा घालतात. त्याच्याशी आट्यापाट्या खेळतच ते त्याचे सांत्वन करतात असे दृश्य नाटकात आहे. या दृश्याद्वारे नानाची झालेली कोंडी आळेकरांनी आपल्याला सांगितली आहे. त्याचा आईबरोबर होणारा संवादही तसाच तुटक आहे –

आई : नाना ....

नाना : कधी झालं ?

आई : आज पहाटे.

नाना : मग अजून कां नेलं नाही ?

आई : तुझ्यासाठी थांबलेत.

नाना : का ?

आई : का काय ? अग्नी कोण देणार ?

नाना : उगीच थांबलात.

आई : कां ?

नाना : का काय ? देह खराब झाला म्हणजे ?

आई : अं !

नाना : फार वेळ मृत देह ठेवू नये. निदान बर्फ तरी आणून ठेवायचा.

आई : खरंच की, लक्षातच नाही.

प्रेक्षकांची मानसिकता बर्फात थिजवून टाकणारा हा संवाद नानाच्या 'मी कोणाचा आहे ?' या मन:स्थितीतून निर्माण झाला आहे. भांडवलशाही व्यवस्थेत ही मनोवस्था येऊ शकते. कारण भांडवलशाहीत फक्त वस्तूंचा व्यापार मांडला जात नसतो तर आपल्या भावना, संकल्पना, नाती या सगळ्याचे व्यापारीकरण करण्यात येत असते. परंतु समाजाची मूलभूत प्रवृत्ती हे व्यापारीकरण झिडकारण्याची असते म्हणून संघर्ष निर्माण होतो.

रोज सकाळी 'बोर्नव्हिटा' पिणारा मुलगा शाळेच्या क्रिकेट टीमचा कॅप्टन होतो असे रंगीबेरंगी फिल्मी जाहिराती आपल्याला सांगतात. 'टोनोज सेव्हन' टॉनिक पिणारा मुलगा वर्गात पहिला नंबर काढतो, 'बिन्नी'चे कपडे वापरणारा मुलगा पायलट होतो, 'सर्फ'ने पांढरे स्वच्छ केलेले कपडे पेहरणारा मुलगा मोठेपणी एक्झिक्यूटीव होतो. नवऱ्याच्या छातीवर विक्स चोळणारी सेवाभावी पत्नी जाहिरातीत दाखवतात तेव्हा ते फक्त विक्स वेपोरबची जाहिरात करीत नसतात तर काही नात्यांची, त्यांनी बजवायच्या विशिष्ट भूमिकांची ती जाहिरात असते. 'फॅरेक्स' लहान मुलाला देऊन त्या मुलाच्या गोड हसण्यात रमणारी आई दाखवताना 'मातृत्वाची' एक विशिष्ट संकल्पना आपल्या मनात रुजवण्यात येत असते.

"Baby foods are not bought by babies., They are bought by their mothers. Here is an interesting marketing situation, where the consumer is baby, but buyer—the mother. And therefore, to popularise our babyfood, we must sell the concept of motherhood, which is always there in any mother, of course."

बेबी फूडस् विकणाऱ्या एका बहुराष्ट्रीय कंपनीच्या रिपोर्टमधील हा एक परिच्छेद आहे.

सुमारे वीस वर्षांपूर्वी भारतात बेबी फूड्स् फारशी प्रचलित नव्हती. ज्या उच्च मध्यमवर्गातील विभक्त कुटुंबांमध्ये आज ती विशेष लोकप्रिय आहेत त्या उच्च मध्यमवर्गाचा तेव्हा सामाजिक जन्मच (आपल्या देशात) झाला नव्हता. संकल्पनाच विकायला काढलेल्या समाजातील संवेदनाक्षम मने सिनिसीझम्‌कडे वळतात कारण सत्य नाती, संकल्पित नाती, आणि भावनांचे झालेले व्यापारीकरण त्यांना समजू शकत नाही. आणि अशा मनाच्या निर्वात पोकळीत सिनिसीझम्‌चे तत्त्वज्ञान भरले जाते. आळेकरांच्या 'महानिर्वाण'चा मुख्य आशय जरी असा सिनिक नसला तरी त्याचा उद्‌भाव काही ठिकाणी दिसतो हे मात्र मान्य करायला हवे. किंबहुना अशी भीती वाटते की त्या चक्रात ते वैचारिक दृष्ट्या सापडतील.

बालमनाला फसवून हट्ट पुरा करण्याच्या संस्कारांवर विडंबनाचा हातोडा हाणताना जी उदाहरणे आळेकर देतात त्यातील निदान एक उदाहरण मला अशा उद्याच्या धोक्याची खूण वाटते. विनोदाचे आवरण चढवलेले असल्यामुळे त्या उदाहरणाचा निर्देश केल्यास आळेकर खांदे उडवून मोकळे होऊ शकतात हे खरे. पण काही अंशी का होईना सिनिसीझम्‌ची ती एक निश्चित जागा आहे. नाटकात भाऊराव म्हणतात,

"हट्टाचे कौतुक करण्याची आणि मनाची फसवणूक करून हट्ट पुरा करण्याची आपली प्राचीन परंपरा आहे."

प्रथम कौसल्येने रामाला चंद्र कसा दिला त्याचे वर्णन करून भाऊराव पुढे म्हणतात,

"अश्वत्थाम्याची पण तशीच कहाणी. बिचाऱ्याच्या पदरी तर इतके दारिद्र्य की मातेने दूध म्हणून पीठ पाण्यातून कालवून दिले. अश्वत्थाम्याने तोंड वेडेवाकडे करीत का होईना त्याचे प्राशन केले. हल्ली निघालेल्या दुधाच्या पावडरीचे मूळ अशा रीतीने आपणास महाभारतात सापडते."

सहज माहिती म्हणून आळेकरांना सांगतो की व्यासमुनींनी केलेल्या वर्णनानुसार अश्वत्थाम्याने ‘ तोंड वाकडे करून, प्राशन केलेले नाही ’ तर

“ प्यालो मी रे दूध कुमारा,
गर्जत जातो अश्वत्थामा
ब्रह्मानंदी बाळ रंगला ”

पिठाचे दूध पिऊन का होईना (अश्वत्थाम्याने खरे दूध कधीच प्यालेले नसल्याने ते त्याच्या दृष्टीने खरेच दूध होते ) अश्वत्थाम्याने आपल्यावर झालेल्या भयानक अपमानाचा बदला घेतला आहे. आपल्या दारिद्र्याची टिंगल उडवणाऱ्या श्रेष्ठींची जिरवल्याचे त्याला समाधान आहे.

परंतु अश्वत्थाम्याच्या या आनंदाकडे पाहूनही त्याच्या मातेच्या अंतःकरणाचे मात्र अक्षरशः तुकडे तुकडे झाले आहेत. अश्वत्थामा आईच्या मांडीवर झोपू लागतो, तेव्हा त्याला थोपटताना तिचे दोन अश्रू त्याच्या गालावर पडतात.

टपटप गळती तिची आसवे । बाळाच्या मग कोमल गाली ।
मनी चमकुनी पोर विचारी । झाले आई तुला काय गे ?
सांगावे ते कसे तियेने । बाळा तुजला **मी** फसविले ।
दूध नव्हे रे, पिठात पाणी । कालवून तुज राया दिधले ।

अश्वत्थाम्याच्या आईला माहीत आहे की, आपण मुलाला फसवीत आहोत, पण तिचा इलाज नाही, अठराविश्वे दारिद्र्याने तिचे हात बांधले आहेत. हे कारुण्यच मर्ढेकरांना स्पर्श करून गेले होते आणि ते अश्वत्थाम्यावर एक संगीतिका लिहीणार होते. आळेकरांना हे कारुण्य समजले असते तर बालमनाच्या फसवणुकीच्या दाखल्यात त्यांनी हा दाखला दिला नसता. संपूर्ण संस्कृतीच फसवणुकीच्या पायावर उभी नसते. काही परंपरा उज्ज्वलही असतात. धर्म, परंपरा, विधी यांची बंधने झुगारून देताना Let us not throw away the baby with the basket. अश्वत्थाम्याच्या आईच्या आक्रंदनाची चेष्टा करताना आळेकरांनी जर हे ध्यानात घेतले असते की—

जखम आईच्या काळजातली । युगेयुगे ती वाहत आहे
बुद्ध ख्रिस्त अन् गांधी । आले गेले तरी ती तशीच वाहे ।

अनंत अगणित अश्वत्थामे । अनंत अगणित त्यांच्या माता
रात्रंदिन दिसता भंवताली । व्याकुळता ये माझ्या चित्ता ।

वि. स. खांडेकरांच्या कवितेत व्यक्त झालेली ही व्याकुळता आळेकरांना स्पर्शू शकली नाही. अशा कोट्यवधी माता आहेत की ज्या आपल्या मुलांना पाण्यातून पीठही मिसळून देऊ शकत नाहीत, त्या मातांच्या आसवांचा भावार्थ जर त्यांना गवसला नाही तर मात्र आळेकर अपरिहार्यपणे सिनिसिझमच्या पिंजऱ्यात सापडणार आहेत. तसे सापडावे की नाही हा त्यांचा प्रश्न आहे. परंतु त्यांनी तो वैचारिक पर्याय निवडला तर मात्र त्यांनी जुलमी मूल्यव्यवस्थेविरुद्ध म्हणजेच एका अर्थाने फॅसिझमविरुद्धही पुकारलेले बंड अपुरे राहणार आहे.

अशा समाजरचनेबद्दल आळेकरांना तिरस्कार आहे म्हणून एक गोष्ट सांगतो. ही सत्यकथा न्यूरेम्बर्ग खटल्यात एका साक्षीदाराने सांगितली आहे.

पोलंडमधील विल्ना येथील ज्यू स्मशानभूमीत काही ज्यू लपून राहिले होते. गॅसचेंबरला कसेतरी चुकवून ते तेथे आले होते. बहुतेकसे थडगी उकरून त्यातच राहत असत. अनेकांना असे थडग्यात जगणे अशक्य झाले होते. अशा काळात हा साक्षीदार विरंगुळा म्हणून कविता करीत असे. एकदा बाजूच्याच एका थडग्यात एक मूल जन्माला आले. जवळच्याच थडग्यात लपून राहिलेल्या ८० वर्षांच्या म्हाताऱ्याने सुईणपण केले होते. मुलाचे पहिले रडणे ऐकू आल्यावर त्या वृद्धाने प्रार्थना केली, ‘परमेश्वरा, या मुलाद्वारे तू आपला प्रेषितच पाठवलेला दिसतोस. तुझा अवतार सोडून दुसरे कोण बरे थडग्यात जन्म घेणार ?’ दोन तीन दिवसांनी या कवीच्या नजरेस पडले की मुलाला पाजायला त्या अशक्त आईच्या स्तनात दूध नाही. बाहेरून दूध आणणे शक्य नाही. घसा कोरडे पडलेले ते अर्भक आईचे अश्रू चाटत होते. आणि या कवीची कविता आटली होती.

आपल्या जुलुमी मूल्य व्यवस्थेतील फॅसिझमची लक्षणे तपासताना भांडवली यंत्रणेतील अपरिहार्य laissez faire चे भांडवलशाहीचे तत्त्वज्ञान समजून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला तर सिनिसिझम, निहिलिझम् पासून आणि

भाबड्या आशावादापासून दूर राहता येईल. हत्याकांडाचे तंत्र आज मानसिक पातळीवर वापरले जात आहे. हे तंत्र आता परिपूर्णत्वास गेले आहे. सर्वांत भयंकर गोष्ट ही की प्रत्यक्ष होणाऱ्या हत्याकांडाची दखल घेत असताना मानसिक पातळीवर होणाऱ्या हत्याकांडासंबंधी कोणी विचारही करताना आढळत नाही. लोकमाध्यमांमधून प्रसृत केलेले संस्कार समाजावर किती खोल परिणाम करीत असतात याबाबतचे विश्लेषणात्मक विवेचन करताना समाजशास्त्रज्ञ मार्शल मॅक्लुहान म्हणतात,

"Ours is the first age in which many thousands of the best trained individual minds have made it a full-time business to get inside the collective public mind. To get inside in order to manipulate, exploit, control is the object now. And to generate heat not light is the intention. To keep everybody in the helpless state engendered by prolonged mental rutting is the effect of many advertisements and much entertainment alike."

अशा अमानुष भांडवली विचारसरणीने आणि कालबाह्य मूल्यव्यवस्थेने हिटलरला जन्म दिला होता. फॅसिझम्चे तत्त्वज्ञान बनवले होते. पुढे फॅसिझमची यंत्रणा म्हणून जरी पराभव झाला तरी ते अमानुषत्व जागोजागी प्रकटताना दिसते. चिली, दक्षिण आफ्रिका येथील सध्याच्या राजवटींचा वैचारिक पाया तशा विचारसरणीत आहे. आणि आर्थिक पाया यूरो-अमेरिकन साम्राज्यशाहीच्या धोरणात व व्यवस्थापनात आहे. परंतु दिवसेंदिवस अधिकाधिक प्रगल्भ होणारे जगभरचे समाजजीवन त्या विचारसरणीचा पराभव करणार हे तर स्पष्टच आहे. या नाटकातही तसा विश्वास व्यक्त केला गेला आहे.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत विविध स्तरांवर निर्माण झालेल्या अंतर्विरोधाचे दर्शन आपल्याला 'महानिर्वाण' नाटकात घडते; इतकेच नव्हे तर वास्तव परिस्थितीला सामोरे जाऊन ती बदलण्याचा प्रयत्न आपण करायला हवा असा विश्वासही हे नाटक देते. म्हणूनच मराठी रंगभूमीवर आजवर झालेल्या इतर बहुतेक नाटकांपेक्षा ते श्रेष्ठ ठरते. आधुनिकतेचा, पुढील शतकात

डोकावून पाहणारा आशय हे या नाटकाचे विशेष सामर्थ्य आहे. नाना भाऊंना सांगतो,

" रड्र आवरा माझे वडील. रड्र आवरा. कितीही रडलात तरीही तुम्ही बाहेरचे आहात. मेलेले आहात. भूतकाळ आहात. वर्तमान आम्ही आहोत. त्यात फरक करण्याचा तुम्हाला दिलेला अधिकार काळाने हिरावून घेतला आहे. "

भौगोलिक, धार्मिक सीमांचे उल्लंघन करून जगात कोणालाही भिडू शकणारे हे नाटक आहे. कारण त्यात उभे केलेले प्रश्न हे आज जागतिक पातळीवर चर्चिले जात आहेत. सॉक्रेटिसाने विचारलेल्या प्रश्नांप्रमाणे ते प्रश्नच प्रस्थापित विरोधी आहेत. विशेषत: स्त्री-पुरुष संबंधात उपस्थित होणारे प्रश्न.

जगभर वाढते घटस्फोटांचे प्रमाण पाहून कित्येकांना चिंता वाटते. पण माझ्या दृष्टीने समाजातील मोकळेपणा आणि सुदृढता वाढत असल्याचेच ते एक लक्षण आहे. स्त्री-पुरुष संबंधात अधिकाधिक स्वातंत्र्याची भावना निर्माण होत आहे. एका ब्रिटिश समाजशास्त्रज्ञाने म्हटल्याप्रमाणे Tyranny of Monogamy (एकपत्नीत्वाचा जुलूम) उद्ध्वस्त होत आहे. या विषयावर एक स्फुटनिबंध लिहिताना खुशवंत सिंगांनी म्हटले होते, ' लग्न हा एक करार आहे असे जर कायद्याने मान्य केले आहे, तर हा करार ठराविक मुदतीचाच का असू नये ? दर पाच वर्षांनी पती-पत्नींनी आपला करार आवश्यक वाटल्यास renew ( वाढवावा ) करावा नाहीतर संपुष्टात आणावा. अखंड एक पत्नी व एक-पतीत्वाचा हा जुलूम माणसाने या युगात का मानावा ? '

लग्नसंस्था आणि विधी यावरही आज परिस्थितीमुळे आघात होऊ लागले आहेत. पहिल्या महायुद्धानंतर, रशियातील कामगार–क्रांतीनंतर, भांडवल-शाहीतील जागतिक अरिष्टाच्या काळात म्हणजे १९२८–३० या काळात बर्ट्रांड रसेल यांचे Marriage and Morals हे पुस्तक प्रसिद्ध झाले होते. प्रस्थापित नीतिमूल्यांना ते पुस्तक म्हणजे आव्हान होते. रसेलवर परंपरानिष्ठ प्रस्थापितांनी कठोर हल्ला चढवला कारण त्यांच्या मते रसेल समाजात अनीती, अश्लीलता, अविचार, अराजक पसरवीत होता. अशाच कारणांसाठी चार्ली

चॅप्लीन आणि बर्नार्ड शॉवरही प्रखर टीका झाली होती. परंतु नवीन मूल्यांच्या शोधात निघालेले हे तीन धाडसी विचारवंत होते.

आज स्त्री-मुक्ती चळवळीच्या, लोक-विज्ञान चळवळीच्या जगभरच्या पुरस्कर्त्यांनी तो विचार कितीतरी प्रगत केला आहे. मुलांच्या जाणिवा समृद्ध करायला हव्या, त्यांना सामाजिक जाणीव दिली जावी, आजूबाजूच्या अपरंपार दु:खाचे, अन्यायाचे, विषमतेचे निर्मूलन करता येणे शक्य आहे असा विश्वास मुलांच्या मनात जोपासला जावा यासाठी विविध प्रकारचे उद्‌बोधक, कधीकधी स्फोटक विचारांना चालना देणारे वाङ्मय युरोपात प्रसिद्ध होत आहे. (प्रिय बाई, हे ग्रास–ग्रंथालीने प्रसिद्ध केलेले पुस्तक इटालीतील अशाच एका उपक्रमाचे भाषांतर आहे) मुलांनी समाजात कसे वागावे हे शिकविण्याऐवजी समाजव्यवस्थेचे अंकित कसे व्हावे हे सांगणाऱ्या प्रस्थापिताविरुद्ध आज जगभर बंड पुकारले जात आहे.

(अगोदर म्हटल्याप्रमाणे ही बंडं, अराजकवादाच्या, सिनिसिझमच्या पिंजऱ्यात पकडण्याचे प्रयत्नही प्रस्थापितांनी सुरू केले आहेत. ‘महानिर्वाण’ बऱ्याच अंशी त्या पिंजऱ्यांना टाळून आपल्या बंडाचा झेंडा फडकावते. हे नाटक खऱ्या अर्थाने आधुनिकतेचा आशय मांडते असे मी म्हटले ते जगभर चाललेल्या अशा विचारमंथनाच्या पार्श्वभूमीवर.)

(‘महानिर्वाण’ नाटक प्रश्नांची मांडणी करते, उत्तरे सुचवतेच असे नाही. परंतु प्रश्नांची नीट मांडणी केल्याखेरीज उत्तरे शोधणेही कठीण असते.)

(सामाजिक बंधनांमुळे गुंतागुंतीच्या वाटणाऱ्या आपल्या अपरिहार्य मानवी नात्यांतून मुक्त होण्यासाठी प्रत्येक जण प्रयत्न करीत असतो. परंतु कोणतीही व्यक्ती समाजजीवनापासून मुक्त होणे शक्य नाही. हे समाजजीवनच अधिक सुदृढ होण्याच्या दिशेने आपला प्रयत्न असायला हवा. ती व्यक्तिगत पातळीवरची अमूर्त मुक्ती अशक्य आहे याची जाण आळेकरांना आहे. गोंधळून गेलेला नाना नाटकात म्हणतो,

“ माझं डोकंच आऊट झालंय. कधी कधी वाटतं माझा ‘टारझन’ होऊन जावा. भाग १ ते १५. म्हणजे अगदी बघायला नको. विचार करायला नकोत,

नाती, गोती, बोलणं काही नको. आपलं अस्तित्व आपल्याला जाणवायलाच नको. नुसतं आपलं गोरिला माकडाचं बोट धरायचं. संकटाचे वेळी आरोळी मारायची. संकटे दूर होतात. पुन्हा आपण आपले गोरीला धरायला मोकळे. जंगलचा राजा टारझन .... आ ऽ ऽ ऽ ऽ"

परंतु पुढे नानाच्या लक्षात येते की आपल्या अस्तित्वापासून आपल्याला मुक्ती मिळणे अशक्य आहे. समाजजीवनापासून विभक्त होऊन तशी मुक्ती मिळणार नाही हे लक्षात आल्यावर तो म्हणतो,

"भाऊ, तुम्ही आणि आईनी माझी सुरुवात करू दिली. हे अस्तित्व जाणवणारच. कितीही इच्छा केली तरी माझं विसर्जन होणार नाही. माझा टारझन होणार नाही."

(आळेकर खोट्या विफलतावादापासून मुक्त असल्याचा हा एक पुरावा.

स्वतः भाऊरावसुद्धा प्रत्यक्ष चितेला अग्नी दिल्यावर आपल्या आख्यानाच्या अखेरीस म्हणतात,)

"मंडळी जरा थांबा. कवटी फुटायला अजून अवकाश आहे. तोवर माझे आख्यान पुरे करू द्यात. प्रसंगच असा आहे की काळ्या बाजारात जळावे लागते. पण जागा पूर्वीचीच असल्याने मनाला सात्विक समाधान आहे ... डोळ्यांना कणकेच्या गोळ्यांचा गारवा जाणवतोय. त्याच्या गारव्याने रंगीबेरंगी काजवे चमकत आहेत. अंधार दाटतो आहे. चित्रविचित्र आकार दिसत आहेत. एखादा आकार आमच्या चाळीसारखा दिसून जातो. रमा दिसते. रमेने मांडलेला संसार दिसतो ··· मला नाना आठवतो. नाना होण्याच्या आधीचे दिवस आठवतात. (पण) ह्या सगळ्यातून मी बाहेरचा. कारण फक्त पंचप्राणांचा फरक. मेल्यावर अग्नीची घाई करणारा मी, चटके बसल्यावर मात्र मला सासू-सुनेच्या गोष्टीची आठवण होत आहे. (उच्च स्वरात) आवा चालली पंढरपुरा। सासू यात्रेला चालली आहे पण संसाराचा पाश सुटत नाही ...

"वरवर विरक्तीच्या गोष्टी सुनेला सांगणारी सासू शेवटी कळवळून म्हणते—

आता कासया यात्रे जाऊ। काय जाऊ नि तेथे पाहू ॥
मुले लेकुरे घरदार। माझे येथेचि पंढरपूर ॥

(पण मंडळी, माझे पंढरपूर येथे नाही. चौकटीसकट दिसणारा संसार माझा नाही.")

जीवनाबद्दलची ही रास्त आस्था आळेकर इतक्या प्रभावीपणे मांडतात म्हणून तर नाटकातील क्वचित डोकावून जाणाऱ्या सिनिसिझम्‌चा पराभव होतो. शून्यवादाचे तत्त्वज्ञान शिंगावर घेऊन आळेकर त्या तत्त्वज्ञानाशी स्पॅनिश बुल–फाईट देतात.

आणि शेवटी म्हणतात,

" आता एकच इच्छा आहे. चाळीच्या नळाचे पाणी जायच्या आत माझी कवटी फुटो,

देह जावो अथवा राहो।
पाण्याआधी कवटी जावो॥
देह जावो अथवा राहो।
पांडुरंगी लीन व्हावो॥ "

या नाटकाचा आशय अगदी मूलभूत स्वरूपाचा असूनही एकदाही नाटक कर्कश, जडजंबाल आणि बोजड होत नाही याचे कारण म्हणजे आळेकरांनी विनोदाचा वज्रास्त्रासारखा केलेला उपयोग. काळीज भेदून तो विनोद आपला ठाव घेतो आणि जुलमी मूल्यव्यवस्थेचे विदारक विडंबन करतो. उदा. स्मशानातला हा प्रसंग घ्या. नानासारखेच आणखी दोघेजण स्मशानात पिंड घेऊन आले आहेत ( पिंड म्हणून क्रिकेटचा चेंडू दाखवला आहे. त्या चेंडूचे टप्पे-टप्पे करत नाना स्मशानापर्यंत पोचतो. ) एक इसम आपण बरोबर आणलेला पिंड दुसऱ्या एका पिंडाच्या अगदी जवळ ठेवतो—

" इसम १ : तुमच्या बापाने कधी असा पिंड ठेवला होता का ?

इसम २ : माझ्या बापाचा पिंड काढता. एक देईन ठेवून. ...

इसम १ : तुम्ही झक मारत इथेच कशाला कडमडलात ?

इसम २ : बाप मेला म्हणून. इथे कुणी सुखासुखी येत नसतं. तुम्हाला काय वाटतं मी पिंड घेऊन इथे ब्रेकफास्टला आलोय ?

इसम १ : पण मी आणलेल्या पिंडाच्या इतक्या जवळ तुम्ही तुमचा पिंड कशाला ठेवला ? दहा फुटाच्या परिघात कधी कुणी दुसरा पिंड ठेवला होता का ?

REFBK-0023096
REFBK-0023096

इसम २ : मी ठेवलाय ना ?

इसम १ : ही वस्तुस्थिती गृहीत धरूनच आपण भांडतोय"

एकूणच स्मशानातील खुळ्या रीतिरिवाजांचे हिंस्र विडंबन आळेकर करतात.

"इसम १ : आमचे वडील साधे शाळामास्तर. शक्य होतील नव्हतील त्या सगळ्या इच्छा बोलून दाखवल्या. अगदी तुमच्या नावानं शाळा काढू असे देखील बोललो. म्हटलं कावळा शिवायला म्हणायची इच्छा. मग गंडवायचं.

इसम २ : तुमचे वडील शाळामास्तर होते ना ?

इसम १ : हो. तीस वर्षं.

इसम २ : मग मी तुम्हाला सांगतो तसं करा. तुम्ही पिंडाजवळ खडू ठेवा खडू. आत्ता शिवेल.

इसम १ : खडू ! हे तुम्ही मला सांगताय. रंगीत खडूसुद्धा ठेवून बघितला. पण झाट कावळा येईना."

पुढे तर चक्क नानाच काळा गाऊन आणि काळा चष्मा लावून कावळ्याचे रूप घेऊन येतो. आणि त्या कावळ्याचा या इसमांशी संवाद होतो. हा प्रसंगच प्रभावी विडंबनाने उभा केला आहे. एक इसम त्या कावळ्याच्या अंगावर खेकसतो,

"इसम : ए शिवतो की नाही ?

कावळ्याच्या वेषातील नाना : अय ! भनभन् नाय पाहिजे. आमची मोनापोली आहे. पिंडाला आम्हीच लागतो. पोपट वगैरे नाही चालत. शिवीन तर शिवीन. नाही तर उडून जाईन. उडू का ? लावा दर्भाचा"—

कावळा पिंडाला शिवतो आणि त्या इसमाला म्हणतो,

"तुमचा रेशनचा दिसतोय. निदान पिंडाला तरी आंबेमोहोराचा आणायचा. पण कावळ्याचा विचार करतो कोण ?"

पुढे तो इसम कावळ्याला उद्देशून म्हणतो,

"इतका वेळ लावलास भाडखाऊ. पुढच्या खेपेस दर्भाचाच लावून तुझी

ठासतो थांब. वर आंबेमोहोर मागतोय. चुत्तड ... " असे कितीतरी दाखले देता येतील.

केवळ विनोदाचा वापरच नव्हे तर आळेकरांनी भाषेचाच वापर विलक्षण प्रभावी केला आहे. किंबहुना आळेकर कवीही शब्दांच्या बंधनात सापडत नाहीत. तापलेल्या कांबीसारखी ते भाषा पाहिजे तेथे वाकवतात आणि आपले संज्ञाविश्व किती संपन्न होऊ शकते याची जाणीव करून देतात. भाऊरावांची भाषा पारंपरिक तर नानाची—

" ही भाषा वेगळी असेल, तरी आख्यान तेच – महानिर्वाण. पण परंपरा स्वरांची आहे. त्या घराण्याची भावना स्वरांतून व्यक्त झाली पाहिजे. एवी तेवी आख्यान लावलेच आहे ... तेव्हा घ्या म्हणून—

" माझ्या काळजाची तार कुणी छेडिली
कशी नशीबानी थट्टा आज मांडिली
कुण्या गावी होता एक ' भाऊ ' म्हणती त्यास
त्याच्या संसाराची पार मारुनी टाकली "

मराठी मेलोड्रामाने प्रचलित केलेल्या आविष्काराचे असे धिंडवडे आळेकर या ' पिंजरां 'तील गाण्याच्या विडंबनात्मक उपयोगाने करून टाकतात.

किंवा शेवटी चितेची सज्जता करताना नाना भाऊंना उद्देशून म्हटतो,

" घ्या. लाकडं घ्या. गोवऱ्या घ्या. ब्लॅकमधलं रॉकेल घ्या. आणि ब्लॅकमध्ये जळा. आता आपला प्रवास वेगवेगळा भाऊ. पंचप्राणांनीयुक्त तुमचा रसिला देह जाऊन फक्त कार्बन आणि फॉस्फरसचे रूक्ष विश्व उरणार. जळा भाऊ, पोटभर जळा. तिरडीवरून न आणता चालत आणलेल्या ह्या भाऊंचा हा नाना आता आयुष्याच्या धंद्याला उभा आहे .... हा ओंडका छातीवर घ्या. हे चंदनाचे लाकूड उशाशी घ्या. अंगावर गोवऱ्यांची दुलई घ्या. जळा भाऊ, पोटभर जळा ... तुम्ही निघून चाललात ... लकी आहात. तरी सुद्धा भाऊ तुम्ही निर्धास्त जळा."

या नाटकात आशय आणि आकृतिबंध यांच्यात अपूर्व एकत्व साधलं आहे

त्याचं एक कारण म्हणजे नाटककार आणि दिग्दर्शक स्वत: सतीश आळेकरच आहेत. परंतु याहीपेक्षा महत्त्वाचे कारण म्हणजे आकृतिबंधातील नावीन्य आणि आशयघनता यांच्यात अचूक संतुलन साधले गेले आहे.

'जुलूस' नाटकात आशयाचा कच्चेपणा असल्याने तेथे आकृतिबंध आशयाला झाकोळून टाकतो. किंवा कादंबरी वाङ्मयातील उदाहरण द्यायचे झाले तर कमल देसाईंच्या 'काळा सूर्य' आणि 'हॅट घालणारी बाई' या दोन लघुकादंबऱ्यांमध्येही आकृतिबंधाच्या मागे आशय राहतो. आशयाची अस्सल आधुनिकता व्यक्त करू शकणारी अशी आळेकरांची भाषाशैली आहे आणि नाट्यतंत्रही.

या नाटकात संवाद असे नाहीतच. पात्रे निश्चितपणे एकमेकांशी बोलत नाहीत इतकेच नव्हे, तर काही संवाद अगदी यांत्रिक पद्धतीने टेलिप्रिंटरवरती येणाऱ्या शब्दांसारखे वाटतात. आळेकरांचा कदाचित असा हेतू असावा की नाती न सापडणाऱ्या आपल्या जीवनात एक यांत्रिकता, कृत्रिमता आली आहे. इतकेच नव्हे, तर संवादच लोपू लागला आहे की काय असेही त्यांना वाटत असावे. काही काही ठिकाणी संवादाची अशी मांडणी असल्यामुळे नाटकाच्या आशयाला विशेष परिमाण मिळते. आणि म्हणूनच हे नाटक सर्वार्थाने आधुनिक ठरते.

भाऊरावांच्या कीर्तनाला, 'महानिर्वाण' आख्यानाला, असलेली ऑर्गनची साथ, चाळकऱ्यांद्वारा प्रकट होणाऱ्या वृत्तींचे त्यांच्या नृत्यातून केलेले दर्शन, एकूणच नाटकाला आनंद मोडक यांनी दिलेला ताल-सुराचा ठेका यामुळे सव्वादोन तास हे नाटक एका वेगळ्या संवेदनांच्या पातळीवर प्रेक्षकाला नेऊन ठेवते. स्वत:तील अंतस्थ प्रवृत्तींशी संघर्ष करायला लावते. प्रत्येक माणसाच्या मनातला सॉक्रेटिस जागृत करते.

आज जगातील सर्व समाजांमध्ये जुनी नीती-मूल्यव्यवस्था ढासळत आहे; 'साहिब, बीबी और गुलाम' या गुरुदत्तच्या चित्रपटात उद्ध्वस्त होणाऱ्या सरंजामी हवेलीप्रमाणे. औद्योगिक क्रांतीच्या झंझावातामुळे जगभर अशा हवेल्या

उन्मळून पडू लागल्या आहेत. या झंझावाताचे स्वागत करताना केशवसुत गरजले होते,

“ जुन्या नभी या ताजे तारक
जुन्या भूमीवर नवी टवटवी,
जुना समुद्र नव रत्ने वी;
जुन्यातून जी निष्पत्ति नवी
काय नव्हे ती श्रेयस्कारक ?

जुने जाऊ द्या मरणालागुनि
जाळुनि किंवा पुरुनि टाका,
सडत न एक्या ठायीं ठाका,
सावध ! ऐका पुढल्या हाका !
खांद्यास चला खांदा भिडवुनि.

१९०१ साली, म्हणजे विसाव्या शतकाच्या प्रारंभीच केशवसुतांनी केलेल्या या आवाहनास आज विशेष अर्थ आहे. प्रचंड, प्रलयी घटनांनी संपन्न अशा ह्या शतकात सर्वच मूल्ये, विचार, सिद्धांत कसोटीला लागले होते. काही कसोटीला उतरले होते तर कांहीचे तीन-तेरा वाजले होते. येणाऱ्या वीस वर्षांत अधिक अद्‌भुत घटना घडणार आहेत. त्यांचा आपल्या जीवनावर विलक्षण खोल परिणाम होणार आहे. हा गतीचा कायदा पाळताना जो थांबेल तो संपणार आहे. कारण विसाव्या शतकाच्याच महानिर्वाणाची तयारी सुरू झाली आहे.



REFBK-0023096
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे